**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

===========================================================================

जावक क्रमांक – ३५७६/४१ दिनांक :- १४ ऑगस्ट, २०२३

प्रसिद्धिपत्रक

# सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी परवडणाऱ्या गृहनिर्मितीची गती वाढविणार - मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे

म्हाडा मुंबई मंडळातर्फे ४०८२ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उत्साहात

मुंबई, दि. १४ ऑगस्ट, २०२३ :- सर्वसामान्यांच्या स्वप्नांना बळ देण्याचे काम म्हाडा करत आहे. म्हाडाच्या माध्यमातून भविष्यात अधिकाधिक परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत यासाठी म्हाडाद्वारे गृहनिर्मितीची गती वाढविण्यात येणार असून त्याकरिता 'म्हाडा'ला शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केले.

नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे म्हाडा मुंबई मंडळाच्या ४०८२ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज काढण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे बोलत होते.

याप्रसंगी विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहराचे पालकमंत्री श्री. दीपक केसरकर, कौशल्य विकास मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा, गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे, आमदार मंगेश कुडाळकर, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती वल्सा नायर-सिंह, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल, सोडत उच्चस्तरीय देखरेख समितीचे अध्यक्ष श्री. जॉनी जोसेफ, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे आदि उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे म्हणाले की, म्हाडाच्या या सोडतीतील ४०८२ सदनिकांसाठी ०१ लाख २० हजार २४४ अर्ज प्राप्त झाले असून सर्वसामान्यांचा म्हाडावरील विश्वास दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे. म्हाडाच्या घरांची लॉटरी पारदर्शी काढण्यात येत आहे. यामध्ये मानवी हस्तक्षेप नाही. पुर्णपणे संगणकीकृत पध्दतीचा वापर केला आहे. हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. म्हाडाच्या या सोडतीत ०१ घरासाठी ३० अर्जदार आहेत. भविष्यात हे प्रमाण ०१ घरासाठी ०७ पर्यंत आणण्यासाठी म्हाडासारख्या शासनाच्या संस्थांना जे सहकार्य लागते ते देण्यात येणार आहे. सामान्य माणसाच्या जीवनात बदल करण्यासाठी व राहणीमान उंचावण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. गिरणी कामगार सदनिका सोडतीतील ४१८ गिरणी कामगारांना सदनिकांच्या चाव्यांचे वाटप करण्यात आले आहे. हक्काच्या घरापासून कोणीही वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे. म्हाडाच्या या लॉटरीच्या

माध्यमातून मुंबई बाहेर गेलेला मुंबईकर पुन्हा मुंबईत येणार असल्याचा विश्वास श्री. एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींचे रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठीच्या विधेयकाला मा. राष्ट्रपती महोदयांच्या मंजुरीनंतर म्हाडा अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आली असून ७९ अ व ९१ अ या नवीन कलमांमुळे उपक्रम प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न सुटणार आहे. सर्वसामान्यांना अधिकाधिक परवडणारी घरे उपलब्ध व्हावी यासाठी कायद्यांमध्ये बदल करण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. हे सर्वसामान्यांचे सरकार असून सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचवण्यासाठी त्यांच्या हिताचे निर्णय सरकारने घेतले आहेत आणि घेत राहणार आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प सुरू होत आहे. देशातील सर्वात मोठा ट्रान्स हार्बर समुद्रावरील रस्ता एक वर्षात सुरू होत आहे. प्रवाशी मुंबईतून २० मिनिटात रायगड जिल्ह्यात जावू शकणार आहेत. कोस्टल रोड, मेट्रो यामुळे मुंबईकरांना वाहतूक कोंडीतून दिलासा मिळाला आहे. शासन आपल्या दारी या उपक्रमामुळे १.५ कोटी नागरिकांना लाभ मिळाला आहे. आरोग्य सुविधा निर्माण करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, म्हाडाला मोफत जमीन मिळते त्यामुळे म्हाडांच्या घरांच्या किंमती खाजगी विकसकांच्या घरांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. शासनाचेही हेच स्वप्न आहे की, सर्वसामान्यांना कमी किंमतीत घरे मिळावीत. यासाठी शासन म्हाडांच्या घरांच्या किंमती कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहे आणि पुढील सोडतीमधील घरांच्या किमती इतर घरांपेक्षा कमी असतील. म्हाडाच्या सोडतीमध्ये अधिक पारदर्शकता यावी यासाठी एकात्मिक संगणकीय प्रणाली सोडतीकरता आणण्यात आली आहे. या प्रणालीमध्ये कुठलीही छेडछाड करता येणार नाही. सर्वसामान्यांना परवडणारी घरे हवी आहेत. ही घरे म्हाडाच्या माध्यमातून उपलब्ध होत आहेत. मात्र, अधिकाधिक परवडणारी घर उपलब्ध करून देण्यासाठी म्हाडाने गृहनिर्माण प्रकल्पांना वेग देण्याची गरज आहे. अधिकाधिक परवडणारी घरे उपलब्ध होण्यासाठी म्हाडाच्या मुंबईतील जुन्या वसाहतींच्या पुनर्विकास प्रकल्पांच्या माध्यमातून विकासकांकडून प्रीमियम न घेता हाउसिंग स्टॉक घेण्यावर भर दिला पाहिजे. मुंबईतील जीर्ण व धोकादायक अवस्थेतील उपकरप्राप्त इमारतींच्या रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्यासाठी म्हाडा ॲक्टमध्ये सुधारणा करण्यात आली असून ६०० विकासकांना म्हाडातर्फे नोटीस पाठवण्यात आली आहे. एमटीएचएल प्रकल्पाच्या माध्यमातून नवी मुंबई हा मुंबईचाच भाग होणार असून म्हाडाने भविष्यात नवी मुंबईतही घरांचे नियोजन करावे. म्हाडा सदनिकांच्या बांधकाम खर्च अधिक असून तो कमी करण्याची गरज आहे. यामुळे घरांच्या किमती नियंत्रणात राहू शकतील. या माध्यमातून अधिक माफक किमतीमध्ये सर्वसामान्याला म्हाडाचे घर मिळू शकणार आहे. म्हाडा पारदर्शकपणे सोडत काढून जनतेच्या विश्वास जिंकत आहे. म्हाडा पुनर्विकास करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. नवनवीन योजना राबवित असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

गृहनिर्माण मंत्री अतुल सावे म्हणाले की, परवडणाऱ्या घरांची मागणी वाढत आहे. म्हाडातर्फे कोंकण मंडळाद्वारे ४५०० सदनिकांची सोडत लवकरच काढण्यात येणार आहे. या सोडतीमध्ये ज्यांना घराची लॉटरी लागली नाही त्यांना पुढच्या लॉटरीत कागदपत्रांची पडताळणी करण्याची आवश्यकता असणार नाही. त्यामुळे अर्जदारांनी निराश न होता पुन्हा प्रयत्न करावे.

अपर मुख्य सचिव वल्सा नायर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदर सोडतीचे थेट प्रक्षेपण वेबकास्टिंगच्या माध्यमातून करण्यात आले. हे प्रक्षेपण ३६,२४० जणांनी बघितले. सोडतीमधील विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाईटवर सायंकाळी ६.०० वाजता

प्रसिद्ध करण्यात आली असून विजेत्या अर्जदारांना एसएमएसद्वारेही विजेता ठरल्याबाबतची माहिती तात्काळ कळविण्यात आली आहे.

ऑक्टोबर २०२३ मध्ये कोंकण मंडळातर्फे ४५०० सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत काढण्यात येणार असल्याची माहिती म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी प्रास्ताविक करताना दिली.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

------




प्रधान मंत्री
आवास योजना-शहरी
महाराष्ट्र शासन
म्हाडा
सोडत म्हाडाची..
म्हाडा
महाराष्ट्र
शासन
आयोजित
स्वप्नपूर्ती घरांची...
सोमवार, दि.१४ ऑगस्ट २०२३
महाराष्ट्र गृहनिर्माण व
क्षेत्रविकास प्राधिकरण
सोडत म्हाडाची..


प्रधान मंत्री
आवास योजना-शहरी
महाराष्ट्र शासन
म्हाडा
MHADA
सोडत म्हाडाची..
म्हाडा
महाराष्ट्र
शासन
आयोजित
स्वप्नपूर्ती घरांची...
सोमवार, दि.१४ ऑगस्ट २०२३
म्हाडा
महाराष्ट्र गृहनिर्माण व
क्षेत्रविकास प्राधिकरण
सोडत म्हाडाची..
स्वप्नपूर्ती घरांची...


म्हाडा
म्हाडा


14 Aug 2023, 3:11 PM
Maharashtra Housing and Area Developement Authority
MB-06 - Scattered Tenements
Back
म्हाडा
MHADA


म्हाडा
MHADA
गृहनिर्माण व
प्राधिकरण

